# इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१४-१५

## (पुणे व पिंपरी – चिंचवड महानगरपालिका क्षेत्र)

## प्रसिद्धी निवेदन (दिनांक ३१/५/२०१४)

---

### महाराष्ट्र राज्य बोर्डा व्यतिरिक्त इतर बोर्डाच्या विद्यार्थ्यांसाठी

पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने देण्यात येणार आहेत. इ.११ वी ऑनलाईन प्रवेशाची अर्ज व माहिती पुस्तिका सर्व विद्यार्थ्यांना मिळालेली आहे. त्याप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज पार्ट १ (Aplication Form) भरलेला आहे.

माहिती पुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे सीबीएसई /आयसीएसई/आयबी/ आयजीएसई/एनआयओएस महाराष्ट्र राज्य बोर्डाव्यतिरिक्त बोर्डाच्या विद्यार्थ्यांसाठी खालील दोन मार्गदर्शन केंद्रे ठेवलेली आहेत.

१) मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज, डेक्कन जिमखाना, पुणे

२) नेस वाडीया कॉलेज, पुणे १

या मार्गदर्शन केंद्रावरुन महाराष्ट्र बोर्डा व्यतिरिक्त इतर बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे इ. ११ वी ऑनलाईन पध्दतीने भरलेले प्रवेश अर्ज व्हेरीफिकेशन करुन घ्यावयाचे आहे. त्या संदर्भात खालील महत्वाच्या सूचना देण्यात येत आहेत.

- महाराष्ट्र राज्य बोर्डा व्यतिरिक्त इतर बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरताना निवडलेल्या मागदर्शन केंद्रावर जावून स्वतःचा इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्ज प्रमाणित (व्हेरीफिकेशन) करुन घ्यावा.
- सीबीएसई व आयसीएसई च्या विद्यार्थ्यांनी श्रेणीचे मार्कस् रुपांतरण आपापल्या शाळेच्या मुख्याध्यापकांच्या सही व शिक्क्यानुसार केलेल असावे.



Generated by CamScanner

- पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र अथवा महाराष्ट्र बाहेरील राज्यातील व परदेशातील **सीबीएसई** च्या विद्यार्थ्यांचे श्रेणीचे मार्कस् रुपांतर सी बी एस ई बोर्डाच्या **www.cbse.nic.in** हया वेबसाईटवर नमूद असलेल्या मुंबई येथील चार शाळांकडून करुन घ्यावे.
  - RN Podar School, St. Andrews Road, Santacruz (West), Mumbai, Maharashtra -400 054 **(022- 26494788/ 26491102/67111111)**
  - Apeejay School, Sector-15, Nerul, New Mumbai, Maharashtra - 400706 **(022 – 27700179/27703635)**
  - DAV Public School Plot No. 11, Sector 10, Airoli, New Mumbai, Maharashtra -460 708 **(022 – 27600658/27698568)**
  - DAV Public School, Plot No. 34, Sector 48, Nerul, Navi Mumbai, Maharashtra 400 706 **(022 – 27714017/27713543/27714016)**
- शासन पत्र क्र. एच.एस.सी/१७११/(२७३-११)/उमाशि-१/दि. १५.०६.२०११ नुसार सीबीएसई बोर्डाच्या ज्या विद्यार्थ्यांनी **सीबीएसई शाळेची परीक्षा** दिली आहे असे विद्यार्थी या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र नाहीत.
- सीबीएसई व आयसीएसई व्यतिरिक्त इतर बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे श्रेणीचे मार्कस् रुपांतरण या कार्यालयाच्या अधिका-यांकडून करुन घ्यावे.(**शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ पत्ता : डॉ. आंबेडकर रोड, कॅम्प पुणे ४११००१**)

(सही) १/६/१५

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १ तथा
अध्यक्ष
इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रकिया पुणे

Generated by CamScanner